महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन




# कामगार पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम – कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे

## राज्यस्तरीय कामगार केसरी, कुमार केसरी कुस्ती स्पर्धा २०२२-२३ विजेत्यांना बक्षीस वितरण

by Team DGIPR February 8, 2023 वृत्त विशेष

मुंबई, दि. ८ : कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून कामगारांच्या पाल्यांना कला, क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. कामगारांच्या पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे प्रतिपादन कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी येथे केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना येथे आयोजित राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभाच्यावेळी मंत्री डॉ. खाडे बोलत होते. यावेळी कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी अभय चव्हाण, मुंबई शहर तालिम मंडळाचे उपाध्यक्ष शशिकांत देशमुख, महेंद्र तायडे आदी उपस्थित होते.

मंत्री डॉ. खाडे म्हणाले, राज्यात राजर्षी शाहू महाराज यांनी कुस्तीला प्रोत्साहन दिले. त्यांचा वारसा राज्याने जोपासला आहे. कुस्ती क्षेत्रातही नवनवीन बदल आणि तंत्रज्ञान आले आहे. मातीवरील कुस्ती आता मॅटवर होत आहे. हा बदल कुस्तीपटूंनी स्वीकारावा.

खेळ म्हटला, की यश- अपयश येत राहते. मात्र, खेळाडूंनी अपयशाने खचून न जाता यशासाठी पुन्हा नव्याने तयारी करावी.  कामगार कल्याण विभागाचे आयुक्त श्री. इळवे यांनी प्रास्ताविकातून या स्पर्धेची माहिती  दिली. माधवी सुर्वे यांनी आभार मानले.




**अरू खांडेकर, कालिचरण सोलनकर विजेते**

या राज्यस्तरीय कुमार केसरी स्पर्धेत अरू हिंदुराव खांडेकर, तर राज्यस्तरीय कामगार केसरी स्पर्धेत कालिचरण झुंजार सोलनकर यांनी विजेतेपद पटकावले. त्यांना अनुक्रमे चांदीची गदा, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र आणि ५० व ७५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. याशिवाय अभिनंदन बोडके याने द्वितीय, ओंकार शिवाजी मगदूम याने तृतीय, तर विवेक कृष्णाजी धावडे याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. दुसऱ्या गटात  भारत संजय पवार याने द्वितीय, प्रथमेश बाबा गुरव तृतीय, तर तानाजी सोपानराव विटकर याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. त्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

- राजू धोत्रे/विसंअ/

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

वृत्तमानस

मुंबई/ पालघर » वर्ष- २६ » अंक-२३० » गुरूवार, ९ फेब्रुवारी २०२३ » पाने- ८

# कालीचरण सोलणकर 'कामगार केसरी' चा मानकरी

प्रतिनिधी

■ मुंबई

मुंबई - सदगुरू श्री श्री साखर कारखाना, आटपाडीच्या कालीचरण सोलणकरने क्रांतिसिंह सहकारी साखर कारखाना, कुंडलच्या भारत पवार सोबत कडवी झुंज दिली. दोन्ही पैलवानांनी डाव-प्रतिडाव टाकत कुस्तीत रंगत आणली. अखेर हुकुमी चालीमुळे कालीचरणने बाजी मारत कामगार केसरीचा मान, चांदीची गदा, मानाचा पट्टा व पंच्याहत्तर हजाराचे पारितोषिक पटकावले. तर कुमार केसरी स्पर्धेत आरु खांडेकर, सदगुरू श्री श्री साखर कारखान्याच्या पैलवानाने उदयसिंग साखर कारखान्याच्या अभिनंदन बोडके वर निर्विवाद वर्चस्व मिळवत कुमार केसरीचा किताब,चांदीची गदा, मानाचा पट्टा व एकावन्न हजाराचे बक्षीस मिळवले.




महाराष्ट्राचे कामगार मंत्री डॉ.सुरेशखाडे यांनी याप्रसंगी सर्व पैलवानांचे कौतुक करीत कामगार कल्याण मंडळाच्या उपक्रमांचे कौतुक केले. ते श्रमिक जिमखाना, येथे झालेल्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित राज्यस्तरीय कामगार केसरी कुमार केसरी कुस्ती स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते. समारंभास कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई शहर तालीम संघाचे उपाध्यक्ष शशिकांत देशमुख, जिल्हा क्रीडा अधिकारी अभय चव्हाण मंडळाचे सर्व अधिकारी व मुंबई शहर तालीम संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

- » कामगार केसरी : तृ - प्रथमेश गुरव (तात्यासाहेब कोरे का.), उत्तेजनार्थ -तानाजी विरकर (सद्गुरु सा. का.)
- » कुमार केसरी : तृ - ओमकार मगदूम (गोकुळ दुध), उत्तेजनार्थ – विवेक धावडे (कुंभी कासारी)
- » गट १ ला ५७ कि. :प्र -रमेश इंगवले (वेदगंगा-दुधगंगा), द्वि –किशोर पवार (विठ्ठल सह.का), तृ- निनाद बडरे (सदगुरू स.का), उत्तेजनार्थ –वैभव पाटील (कुंभी कासारी सा.का.)
- » गट दुसरा ६१ कि : प्र - बापू कोळेकर (सद्गुरु स. का) द्वि- तेजस पाटील (राजाराम बापू सा. साखर का.), तृ - प्रतीक कारंडे (कुंभी कासारी सा. का.) उत्तेजनार्थ -अंकुश गायकवाड (वारणा दूध)
- » गट तिसरा ६५ कि. : प्र.- विनायक मोळे (कुंभी कासारी), द्वि - तुषार माने (जयंत पाटील को-ऑपरेटिव्ह क्रे. सो), तृ - प्रतीक प्रतीक साळोखे (कुंभी कासारी सा का), उत्तेजनार्थ - साईराम चौगुले (भोगावती सा. का)
- » गट चौथा ७० कि. : प्र. - तुषार जगताप (उत्कर्ष भोजनालय सांगली), द्वि - धैर्यशील लोंढे (कुंभी कासारी सा का), तृ - रमेश धामी (हॉटेल अलंकार कराड) उत्तेजनार्थ -ओमराज वाईंगडे (मेटॅलिक्स हुपरी)
- » गट पाचवा ७४ कि : प्र.-ओंकार पाटील (कुंभी कासारी सा का), द्वि- ऋषिकेश काळे (उत्कर्ष भोजनालय, सांगली), तृ. - विजय ढेरे (उदयसिंग सा. का), उत्तेजनार्थ - जय जाधव (उत्कर्ष भोजनालय सांगली)

एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार ९ फेब्रुवारी २०२३
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

# कालिचरण कामगार केसरी तर आरु खांडेकर कुमार केसरी

■ मुंबई

**सदगुरू** श्री श्री साखर कारखाना, आटपाडीच्या कालीचरण सोलणकरने क्रांतिसिंह सहकारी साखर कारखाना, कुंडलच्या भारत पवार सोबत कडवी झुंज दिली कालिचरणने बाजी मारत कामगार केसरीचा मान, चांदीची



गदा, मानाचा पट्टा व पंच्याहत्तर हजाराचे पारितोषिक पटकावले. तर कुमार केसरी स्पर्धेत आरु खांडेकर, सदगुरू श्री श्री साखर कारखान्याच्या पैलवानाने उदयसिंग साखर कारखान्याच्या अभिनंदन बोडके वर निर्विवाद वर्चस्व मिळवत कुमार केसरीचा किताब,चांदीची गदा, मानाचा पट्टा व एकावन्न हजाराचे बक्षीस मिळवले. बक्षिस समारंभास कामगार मंत्री खडे, कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई शहर तालीम संघाचे उपाध्यक्ष शशिकांत देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

**अन्य निकाल** :- कामगार केसरी : तृ - प्रथमेश गुरव, उत्तेजनार्थ -तानाजी विरकर, कुमार केसरी : तृ - ओमकार मगदूम, उत्तेजनार्थ - विवेक धावडे , गट १ ला ५७ कि. :प्र -रमेश इंगवले, द्वि -किशोर पवार , तृ- निनाद बडरे, उत्तेजनार्थ -वैभव पाटील, गट दुसरा ६१ कि : प्र - बापू कोळेकर द्वि- तेजस पाटील तृ - प्रतीक कारंडे उत्तेजनार्थ -अंकुश गायकवाड, गट तिसरा ६५ कि. : प्र.- विनायक मोळे, द्वि - तुषार माने, तृ - प्रतीक प्रतीक साळोखे, उत्तेजनार्थ - साईराम चौगुले, गट चौथा ७० कि. : प्र. - तुषार जगताप, द्वि - धैर्यशील लोंढे, तृ - रमेश धामी उत्तेजनार्थ -ओमराज वाईंगडे , गट पाचवा ७४ कि : प्र.-ओंकार पाटील, द्वि- ऋषिकेश काळे, तृ. - विजय ढेरे, उत्तेजनार्थ - जय जाधव.

# सोलापूरचा युवा मल्ल पै.कालीचरन सोलनकर यंदाचा महाराष्ट्र कामगार केसरी

क्रीडालक्ष टीम Send an email

## https://kridalaksha.com/?p=2321

### सांगलीच्या भारत पवारला केले पराभूत

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्या वतीने दरवर्षी कामगार केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित केली जाते. यावर्षी ही स्पर्धा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना येथे पार पडली.महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांनी आणि मुंबई शहर तालीम संघाच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

मूळचा सोलापूर जिल्हयातील असलेला आणि श्री.श्री.रविशंकर महाराज कारखान्याचे प्रतिनिधित्व करणारा पैलवान कालीचरण सोलनकर याने क्रांती कारखाना कुंडलच्या भारत पवारला 10-0 गुणांनी पराभूत करत यावर्षीचा कामगार केसरी किताब पटकावला आहे.त्याला महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री मा.सुरेश खाडे यांच्या हस्ते गदा आणि किताब देऊन गौरवण्यात आले.

यापूर्वीही अनेकवेळा त्याने राज्य,राष्ट्रीय स्पर्धेत प्रावीण्य मिळविले आहे.महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत त्याने तीनवेळा सुवर्णपदक मिळवले आहे.

कालीचरन हा जुन्या काळातील नामवंत मल्ल स्व.झुंझार सोलनकर यांचा चिरंजीव असून सध्या गंगावेश तालीम कोल्हापूर येथे सराव करत आहे. झुंझार वस्तादांचे भाचे महाराष्ट्र चॅम्पियन पै.संदीप काळे आणि उप महाराष्ट्र केसरी पै.रवींद्र शेंडगे यांच्या पावलावर पाऊल टाकत जोड तोडत प्रगती करत आहे.

त्यांच्या या यशाबद्दल त्याचे तसेच पालक आणि प्रशिक्षक यांचे क्रीडालक्ष परिवारातर्फे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा...

बारामती झटका
न्यूज चॅनल
संपादक - श्रीनिवास शिवाजीराव कदम-पाटील (बी.ए.ऑनर्स)

# सद्गुरू श्री श्री साखर कारखान्याच्या शिरपेचात राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरीच्या रुपाने मानाचा तुरा




पिलीव (बारामती झटका) रघुनाथ देवकर यांजकडून

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्यावतीने दरवर्षी घेण्यात येत असलेल्या महाराष्ट्र कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये मुंबई या ठिकाणी घेतल्या गेलेल्या "कामगार केसरी" व "कुमार केसरी" प्रथम क्रमांकाचा मान सद्गुरु श्री श्री साखर कारखाना कुस्ती केंद्र श्री श्रीनगर (राजेवाडी) च्या कालीचरण सोलंकर, आरु खांडेकर या कामगार मल्लांनी अतिशय जिद्द व चपळाईने मिळवुन सांगली, सातारा, सोलापूर जिल्हयाबरोबरच महाराष्ट्राची मान उंचावून सद्गुरु कारखान्याच्या शिरपेचात महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री मा.ना.सुरेशभाऊ खाडे यांचे हस्ते गदा, स्मृती चिन्ह, प्रशस्तीपत्राने मानाचा तुरा रोवला आहे. या यशस्वी कामगार मल्लांच्या पाठीवरती सतत शाब्बासकीची थाप आणि प्रोत्साहन देऊन त्यांचे मनोबल वाढविणारे सद्गुरु श्री श्री कारखान्याचे चेअरमन एन. शेषागिरीराव, व्हा. चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, सी. एफ. ओ. रोहीत नारा व सर्व संचालक यांनी अतिशय आनंदाने विजयी मल्लांचा सन्मान व अभिनंदन केले. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे "कामगार केसरी" हा किताब सलग पाचव्या वर्षी सद्गुरुच्या शिरपेचात रोवल्याचा आनंद पुर्ण पश्चिम महाराष्ट्रात होत आहे.

याकामी यशस्वी कामगार मल्लांना सि.इ. ओ. आण्णासाहेब शेंडे, जनरल मॅनेजर रामाराव, तसेच एचआर अँड ॲडमिन मॅनेजर सचिन खटके व कारखान्याचे अधिकारी, पदाधिकारी व वस्ताद महादेव ठवरे, अमोल मदने, मोहन मदने, दिलीप शेंबडे, खांडेकर, बडरे, दगडे या सर्वांचे, मोलाचे सहकार्य लाभले. असे विजयी कामगार मल्लांनी सत्काराच्या वेळी आवर्जून सांगितले.

या यशस्वी मल्लांचे सांगली, सातारा, सोलापूर जिल्हयाबरोबर महाराष्ट्रभरामध्ये कौतुक होत आहे.

नवनवीन व ताज्या घडामोडी पाहण्यासाठी आमच्या बारामती झटका फेसबुक पेजला लाईक आणि शेअर जरूर करा. https://bit.ly/31IKDng

महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# मुंबईत रविवारपासून राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धांचे आयोजन

by Team DGIPR February 4, 2023 वृत्त विशेष

मुंबई, दि. 4 :  राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेस उद्या, रविवार दि. ५ फेब्रुवारी २०२३ पासून सुरुवात होत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना, लोअर परळ येथे आमदार अजय चौधरी, कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वणिरे, सोफिटेल रिसॉर्ट अँड हॉटेलचे संचालक सलील देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चंद्रमोरे व कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. ५ ते ७ फेब्रुवारीदरम्यान दररोज संध्याकाळी कुस्त्यांचे सामने खेळवले जातील. सामने मॅटवर खेळवले जाणार असून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांप्रमाणे व मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने कामगारांसाठी कामगार केसरी आणि कामगार पाल्यांसाठी कुमार केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यासह विविध पाच वजनी गटातील सामने यावेळी खेळवले जाणार आहेत. कामगार केसरी स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रु. 75 हजार, द्वितीय रु. 50 हजार, तृतीय रु. 35 हजार व उत्तेजनार्थ रु. 20 हजार आहे. तर कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. 50 हजार, द्वितीय रु. 35 हजार, तृतीय रु. 20 हजार व उत्तेजनार्थ रु. 10 हजार आहे. तसेच वजनी गटात रु. 10 हजार ते 25 हजारांची पारितोषिके दिली जातील.

बजाज ऑटो वाळूंज, कुंभी कासारी सह. साखर कारखाना कोल्हापूर, वडगांव यंत्रमाग वस्त्रोद्योग, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना सोलापूर, विमा साखर डिस्टिलरीज सोलापूर, क्रांती अग्रणी साखर कारखाना कुंडल आदी कंपन्यांच्या 106  हून अधिक नामांकित पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने स्पर्धेस उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/
# वृत्तमानस
मुंबई/ पालघर | रविवार, ५ फेब्रुवारी २०२३ | वर्ष- २६ | अंक-२२६ | पाने- ८

## मुंबईत होणार कुस्त्यांची दंगल

# राज्यस्तरीय कामगार केसरी, कुमार केसरी कुस्ती स्पर्धा आजपासून

■ **मुंबई**

राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेस रविवार (दि.५ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना, लोअर परेल येथे आमदार अजय चौधरी, कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वणिरे, सोफिटेल रिसॉर्ट अँड हॉटेलचे संचालक सलील देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चंद्रमोरे व कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांप्रमाणे व मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांसाठी कामगार केसरी आणि कामगार पाल्यांसाठी कुमार केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. कामगार केसरी स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रु.७५ हजार, द्वितीय रु.५० हजार, तृतीय रु.३५ हजार व उत्तेजनार्थ रु.२० हजार आहे. तर कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु.५० हजार, द्वितीय रु.३५ हजार, तृतीय रु.२० हजार व उत्तेजनार्थ रु.१० हजार आहे.

यासह विविध पाच वजनी गटातील सामने यावेळी खेळवले जाणार आहेत. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना-सोलापूर, विमा साखर डिस्टिलरीज-सोलापूर, उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना-शिराळा, सदगुरू श्री श्री साखर कारखाना-पुणे, क्रांती अग्रणी साखर कारखाना- कुंडल, कलाप्पा आव्हाड जवाहर सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, जयंत पाटील को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी-आटपाडी सांगली, मार्व्हल्स इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड-कोल्हापूर, दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, बजाज ऑटो -वाळूज, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना- सोलापूर व कुंभी कासारी सहकारी कारखाना -कोल्हापूर आदी कंपन्यांच्या १०६ हून अधिक नामांकित पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. कुस्ती शौकीनांनी मोठ्या संख्येने स्पर्धेस उपस्थित रहावे असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

शब्दांना सत्याची धार

प्रहार

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध • वर्ष ११ • अंक ११८ • पाने १४ (...) • ₹ ४.००

# मुंबईत होणार कुस्त्यांची दंगल

## कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा रविवारपासून

**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेस रविवार (दि. ५ फेब्रुवारी)पासून सुरुवात होणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमीक जिमखाना, लोअर परेल येथे आमदार अजय चौधरी, कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वणिरे, सोफिटेल रिसॉर्ट अँड हॉटेलचे संचालक सलील देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चंद्रमोरे व कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्‌घाटन होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांप्रमाणे व मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांसाठी कामगार केसरी आणि कामगार पाल्यांसाठी कुमार केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. कामगार केसरी स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रु. ७५ हजार, द्वितीय रु. ५० हजार, तृतीय रु. ३५ हजार व उत्तेजनार्थ रु. २० हजार असे आहे. तर कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. ५० हजार, द्वितीय रु. ३५ हजार, तृतीय रु. २० हजार व उत्तेजनार्थ रु. १० हजार असे आहे.

यासह विविध पाच वजनी गटांतील सामने यावेळी खेळवले जाणार आहेत. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना-सोलापूर, विमा साखर डिस्टिलरीज-सोलापूर, उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना-शिराळा, सदगुरू श्री श्री साखर कारखाना-पुणे, क्रांती अग्रणी साखर कारखाना- कुंडल, कलाप्पा आव्हाड जवाहर सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, जयंत पाटील को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी-आटपाडी सांगली, मार्व्हल्स इंजिनीअरिंग प्रायव्हेट लिमिटेड-कोल्हापूर, दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, बजाज ऑटो-वाळूज, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना- सोलापूर व कुंभी कासारी सहकारी कारखाना-कोल्हापूर आदी कंपन्यांच्या १०६ हून अधिक नामांकित पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. कुस्तीशौकिनांनी मोठ्या संख्येने स्पर्धेस उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.


नवराष्ट्र

### महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळचा उपक्रम

# मुंबईत आजपासून राज्यस्तरीय कुस्त्यांची दंगल

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यस्तरीय कामगार केसरी आणि कुमार केसरी कुस्ती स्पर्धेस रविवार (दि.५ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना, लोअर परेल येथे आमदार अजय चौधरी, कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वणिरे, सोफिटेल रिसॉर्ट अँड हॉटेलचे संचालक सलील देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चंद्रमोरे व कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

५ ते ७ फेब्रुवारीदरम्यान दररोज संध्याकाळी कुस्त्यांची सामने खेळवले जातील. सामने मॅटवर खेळवले जाणार असून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांप्रमाणे व मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांसाठी कामगार केसरी आणि कामगार पाल्यांसाठी कुमार केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. कामगार केसरी स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रु.७५ हजार, द्वितीय रु.५० हजार, तृतीय रु.३५ हजार व उत्तेजनार्थ रु.२० हजार आहे. तर कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु.५० हजार, द्वितीय रु.३५ हजार, तृतीय



रु.२० हजार व उत्तेजनार्थ रु.१० हजार आहे. तसेच वजनी गटात २५ हजार ते १० हजारांची पारितोषिके दिली जातील.

यासह विविध पाच वजनी गटातील सामने यावेळी खेळवले जाणार आहेत. बजाज ऑटो वाळूंज, कुंभी कासारी सह.साखर कारखाना कोल्हापूर, वडगांव यंत्रमाग वस्त्रोद्योग, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना सोलापूर, विमा साखर डिस्टिलरीज सोलापूर, क्रांती अग्रणी साखर कारखाना कुंडल आदी कंपन्यांच्या १०६ हून अधिक नामांकित पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. कुस्ती शौकीनांनी मोठ्या संख्येने स्पर्धेस उपस्थित रहावे असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

Mumbai Edition
05 February 2023 Page No. 6
epaper.navarashtra.com

# आजपासून कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा

■ मुंबई

लोअर परेलमधील मुंबई महापालिकेच्या श्रमिक जिमखाना येथे राज्यस्तरीय कामगार केसरी आणि कुमार केसरी कुस्ती स्पर्धेस उद्या रविवारी सायंकाळी ५.३० वाजल्यापासून सुरुवात होत आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांप्रमाणे आणि मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान मॅटवर होणार आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांसाठी कामगार केसरी आणि कामगार पाल्यांसाठी कुमार केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. कामगार केसरी स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ७५ हजार, द्वितीय ५० हजार, तृतीय ३५ हजार आणि उत्तेजनार्थ २० हजार रुपये आहे. तर कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५० हजार, द्वितीय ३५ हजार, तृतीय २० हजार व उत्तेजनार्थ १० हजार रुपये आहे.

Navakal Edition
Feb 5, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com
मुंबई

# मुंबईत उद्यापासून कुस्त्यांची दंगल

**मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेला रविवारपासून (५ फेब्रुवारी) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना, लोअर परेल येथे सुरुवात होत आहे.

आमदार अजय चौधरी, कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वणिरे, सोफिटेल रिसॉर्ट अँड हॉटेलचे संचालक सलील देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चंद्रमोरे व कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होईल.

प्रथम पारितोषिक ७५ हजार रुपये, द्वितीय ५० हजार रुपये, तृतीय ३५ हजार रुपये व उत्तेजनार्थ २० हजार रुपये अशी बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५० हजार, द्वितीय ३५ हजार, तृतीय २० हजार व उत्तेजनार्थ १० हजार रुपये असे बक्षीस आहे.

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना-सोलापूर, विमा साखर

पुण्य नगरी

# मुंबईत होणार कुस्त्यांची दंगल

## राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा रविवारपासून

**मुंबई :** राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेस रविवार, ५ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक जिमखाना, लोअर परेल येथे आमदार अजय चौधरी, कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वणिरे, सोफिटेल रिसॉर्ट अँड हॉटेलचे संचालक सलील देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चंद्रमोरे व कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमांप्रमाणे व मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांसाठी कामगार केसरी आणि कामगार पाल्यांसाठी कुमार केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. कामगार केसरी स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ७५ हजार रुपये, द्वितीय ५० हजार रुपये, तृतीय ३५ हजार रुपये व उत्तेजनार्थ २० हजार रुपये आहे, तर कुमार केसरी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५० हजार रुपये, द्वितीय ३५ हजार रुपये, तृतीय २० हजार रुपये व उत्तेजनार्थ १० हजार रुपये आहे. यासह विविध पाच वजनी गटातील सामने यावेळी खेळवले जाणार आहेत. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना-सोलापूर, विमा साखर डिस्टिलरीज-सोलापूर, उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना-शिराळा, सदगुरू श्री श्री साखर कारखाना-पुणे, क्रांती अग्रणी साखर कारखाना- कुंडल, कलाप्पा आव्हाड जवाहर सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, जयंत पाटील को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी-आटपाडी सांगली, मार्व्हल्स इंजिनीअरिंग प्रायव्हेट लिमिटेड-कोल्हापूर, दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना-कोल्हापूर, बजाज ऑटो -वाळूज, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना-सोलापूर व कुंभी कासारी सहकारी कारखाना-कोल्हापूर आदी कंपन्यांच्या १०६ हून अधिक नामांकित पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. कुस्तीशौकिनांनी मोठ्या संख्येने स्पर्धेस उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

Mumbai Edition
Feb 4, 2023 Page No. 09
Powered by : eReleGo.com